# विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
**(सामान्य प्रशासन विभाग)**
**दिल्ली गेट जवळ, फाजीलपूरा, औरंगाबाद**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**ईमेलः-** dcg.aurangabad@gmail.com **दुरध्वनी क्रमांकः ०२४०-२३३१०८४**


---

जा.क्र.२०२२/सा.प्र./कक्ष-१/शि.म.संघ निवडणूक-२०२२/कावि- दिनांकः ०१.१०.२०२२

प्रति,

मा. मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**विषयः औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघसाठी मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम**
मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम ३१(३) अन्वये सूचना प्रसिध्दी
संदर्भः आपले कार्यालयाचे पत्र क्रमांक ईएलआर-२०२२/प्र.क्र.५४३/२२/३३ दि. जुलै, २०२२

महोदय,

औरंगाबाद विभाग शिक्षक मतदार संघासाठी मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम दि.०१.१०.२०२२ पासून सुरु होत असून यासंदर्भातील मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३१(३) अन्वये मराठी व इंग्रजी मधील सूचना औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, जिल्हा परिषदा, उपविभागीय अधिकारी कार्यालये, तहसिल कार्यालये, पंचायत समिती कार्यालये इ. ठिकाणी आज रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच सूचनाच्या प्रती सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना देण्यात आल्या आहेत. सदर सूचनेची प्रसिध्दी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या संकेतस्थळावर देखील करण्यात येत आहे.

नियम ३१(३) नुसार सूचना मराठी व इंग्रजी भाषेमध्ये विभागातील सर्व जिल्हयांमध्ये प्रसिध्द होणा-या दोन वर्तमानपत्रात माहिती व जनसंपर्क संचलनालया मार्फत जाहिरात स्वरुपात प्रसिध्द करण्यात आली आहे.

मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम ३१(३) अन्वये मराठी व इंग्रजी भाषेतील सूचनेच्या प्रती तसेच दैनिक लोकमत व दैनिक पुण्यनगरी वर्तमान पत्राचे वेबलिंक व सूचना प्रसिध्दीचे कात्रण प्रत यासोबत माहितीस्तव सादर करण्यात येत आहेत

सोबतः वरीलप्रमाणे

(जगदीश मिनियार)
**उप आयुक्त, सामान्य प्रशासन,**
**विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद**